
ePaper


# जयकुमार गोरे यांना खंडणी मागितल्या प्रकरणी दिल्लीतील मांत्रिकास अटक!

| वर्ष - 8 | अंक - 312 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

## आतील पानांत


- भारताच्या नव्या पर्वाला 'शुभ' सुरूवात
- भारताला ५ पेनल्टी धावा देण्यात आल्या
- इराणच्या समर्थनार्थ घोषणाबाजी
- अमेरिका-पाकिस्तान काय शिजतंय?


www.mahaenews.com | शनिवार, दि. 21 जून 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## बुद्धिबळाच्या पटावर राजा कोण? वजीर कोण? : इतिहास काय सांगतो ?

# अजितदादांची झुंज काकांशीच !

## माळेगाव कारखान्याची निवडणूक एवढी प्रतिष्ठेची का? अजितदादा म्हणाले, "रात्र वैऱ्याची आहे !"

| बारामती / पुणे / मुंबई | प्रतिनिधी | महाईन्यूज

**माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीच्या प्रचाराची सांगता झाली. वाटेल ते झाले, तरी ही निवडणूक जिंकायची, या ईर्षेने उपमुख्यमंत्री अजितदादा पवार निवडणूक रिंगणात उतरले आहेत. प्रत्यक्ष नसली तरी त्यांची टक्कर काकांशी म्हणजेच शरद पवार यांच्या डावपेचांशी आहे. कारखान्यातील बुजूर्ग चंद्रराव तावरे हे देखील महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत. कार्यकर्त्यांना अजितदादांचा संदेश आहे की रात्र वैऱ्याची आहे, सावधान ! एकूणच निवडणूक प्रचंड प्रतिष्ठेची असून सर्वांचीच प्रतिष्ठा पणाला लागली आहे.**

### पवार विरुद्ध पवार संघर्ष उफाळला!

राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना करणारे शरद पवार आणि या पक्षाला 'हायजॅक' करणारे अजित पवार या दोघांचे पक्ष पुन्हा एकत्र येतील, अशी चर्चा सुरू असतानाच माळेगाव साखर कारखान्याच्या निमित्ताने वादाला तोंड फुटले आहे. पुन्हा एकदा फक्त बारामतीलाच नव्हे तर पूर्ण महाराष्ट्राला पडणारा प्रश्न समोर आला आहे, की काका - पुतण्यामध्ये नेमकी जास्त ताकद कोणाची ?

### संघर्ष दिल्लीपासून गल्लीपर्यंत..

सर्व निवडणुकांमध्ये काका विरुद्ध पुतण्या अर्थात् शरद पवार विरुद्ध अजित पवार हा संघर्ष रंगला होता. दिल्लीच्या निवडणुकीनंतर आता पवार काका पुतण्या गल्लीतील निवडणुकीतही आमने सामने उभे ठाकले आहेत. लोकसभेला काकांनी धोबीपछाड मारली तर विधानसभेच्या फडात पुतण्याने छडीटांग डावात कुस्ती जिंकली होती.

### अजितदादांना चेअरमनपद हवे

आता निमित्त आहे बारामतीतील माळेगाव साखर कारखान्याच्या निवडणुकीचे. या निवडणुकीत अजित पवार यांनी 'नीळकंठेश्वर पॅनल' मैदानात उतरवले आहे. अजित पवार हे स्वत: चेअरमन पदाच्या निवडणुकीसाठी मैदानात उभे ठाकले आहेत. दुसरीकडे, कारखान्यावर वर्चस्व राखण्यासाठी शरद पवार यांनीही शड्डू ठोकला आहे. मर्यादित लोकांसाठी असलेल्या कारखान्या मुळे राज्यातील वातावरण मात्र ढवळून निघाले आहे.



### अजितदादा म्हणाले, सावधान ! रात्र वैऱ्याची आहे !!

माळेगाव कारखान्याच्या निवडणुकीच्या प्रचाराची शुक्रवारी सांगता झाली. चेअरमन पद मिळवणारच या ईर्षेने निवडणुकीत उतरलेल्या अजितदादा पवार यांनी प्रचार समताना कार्यकर्त्यांना संदेश दिला की प्रचार संपला म्हणजे काम संपले नाही. कारण आता रात्र वैऱ्याची आहे येथून पुढे दोन दिवस गाफील राहू नका. अजितदादांच्या सभेची गर्दी ही त्यांच्या गळ्यात विजयाची माळ घालेल, असा अंदाज सहकार क्षेत्रातील बुजूर्गांनी वर्तवला आहे.

### माळेगावची निवडणूक एवढी प्रतिष्ठेची का?

अजितदादांच्या पॅनल विरोधात शरद पवार यांच्या गटाने 'बळीराजा सहकार बचाओ पॅनल' मैदानात उतरवले आहे. या पॅनलचे नेतृत्व अजितदादांचे पुतणे युगेंद्र पवार करत आहेत. तसेच या कारखान्यावर वर्चस्व असणाऱ्या चंद्रराव तावरे यांचे 'सहकार बचाओ शेतकरी पॅनल' आणि अपक्षांचे एक पॅनल या निवडणुकीत उतरलेले आहे.

### आता, 24 तारखेकडे लक्ष..

माळेगाव सहकारी साखर कारखान्याची निवडणूक २२ जून रोजी पार पडणार आहे, तर २४ जून रोजी निकाल जाहीर होणार आहे. २१ जागांसाठी ९० उमेदवार रिंगणात उतरलेले आहेत.

### किती मतदार मतदान करणार?

कारखान्याच्या अंतर्गत बारामती तालुक्यातील सुमारे ३७ गावे येतात. यात सुमारे २० हजार भागधारक आहेत. ते या निवडणुकीत मतदान करणार आहेत. शरद पवार हे देखील मतदान करणार आहेत.

### अजितदादा 41 वर्षांनंतर रिंगणात..

अजित पवार हे तब्बल ४१ वर्षांनंतर साखर कारखान्याच्या निवडणुकीत उतरले आहेत. याआधी ते १९८४ मध्ये इंदापूर येथील छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत उतरले होते आणि त्यांनी विजयही मिळवला होता. ही निवडणूक अजित पवार आणि शरद पवार या दोघांसाठीही प्रतिष्ठेची आहे. येथे मात्र अजित पवारांसमोर शरद पवारांच्या पॅनलसह चंद्रराव तावरे यांचेही आव्हान असणार आहे.

### पवार - तावरे यांच्यातील इतिहास ?

पूर्वीपासून पवार घराणे आणि तावरे घराणे यांच्यात राजकीय वैर आहे. शरद पवार राज्याच्या आणि देशाच्या राजकारणात व्यस्त असताना तावरे गटाने स्थानिक सहकारी क्षेत्रावर वर्चस्व ठेवले होते. पवार घराण्याने अनेक निवडणुका जिंकल्या. मात्र, साखर कारखान्यांच्या निवडणुकीत तावरे यांचाच वरचष्मा होता. गेल्या तीन दशकांत त्यांनी कारखान्याच्या निवडणुकीत पवारांच्या नेतृत्वाखालील पॅनलचा अनेकदा धुव्वा उडवला आहे. २०१९ मध्ये चंद्रराव आणि रंजन तावरे भाजपमध्ये सामील झाले. मात्र, अजित पवार भाजपसोबत आल्यामुळे त्यांनी अजित पवारांसाठी काम केले होते.

### राजकारणावर परिणाम होणार ?

राज्यात आणि केंद्रात भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेसची युती आहे. मात्र, भाजपाने तावरे यांना निवडणुकीतून माघार घेण्यास सांगितलेले नाही. याचा अर्थ भाजपा ही बारामतीत आपला पाया मजबूत करत असल्याचे दिसत आहे. दुसरीकडे शरद पवारांच्या पॅनलचे नेतृत्व युगेंद्र पवार करत आहेत. युगेंद्र यांचा विधानसभा निवडणुकीत पराभव झाला होता, याचा बदला घेण्याचा प्रयत्न युगेंद्र यांचा असणार आहे. त्यामुळे आता मतदार माळेगाव कारखान्याच्या चेअरमनपदाची माळ कोणाच्या गळ्यात टाकतात हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

# खाद्यपदार्थांवर 'एफडीए'ची नजर!

## वारीतील पालखी मार्गावर तपासणी पथके तैनात

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आषाढी वारीत लाखो वारकरी सहभागी होतात. या वारकऱ्यांना स्वच्छ आणि चांगले खाद्यपदार्थ मिळावेत, यासाठी अन्न व औषध प्रशासनाने मोहीम हाती घेतली आहे. पालखी मार्गांवर खाद्यपदार्थ तपासणीसाठी पथके तैनात करण्यात आली आहेत.**



ही पथके रस्त्यांवरील खाद्यपदार्थांच्या गाड्या आणि हॉटेलांची तपासणी करीत आहेत. आषाढी वारी ही पावसाळ्यात असल्यामुळे खाद्यपदार्थ दूषित होण्याची शक्यता असते. त्यामुळे अन्नातून विषबाधा होण्याचा धोका वाढतो. या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाने तपासणीसाठी तीन पथके नियुक्त केली आहेत. यातील प्रत्येक पथकामध्ये सहा अधिकाऱ्यांचा समावेश आहे. ही पथके पालखी मार्गावरील खाद्यपदार्थ विक्रेत्यांची तपासणी करीत आहेत. त्यात खाद्यपदार्थ बनविताना स्वच्छता बाळगण्यात येत आहे का, याची तपासणी केली जात आहे. याचबरोबर खाद्यपदार्थांचे नमुने घेऊन ते तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात येत आहेत. वारीच्या मुक्कामाच्या ठिकाणी अन्न व औषध प्रशासनाची पथके तैनात करण्यात आली आहेत. ही पथके रस्त्यांवरील खाद्यपदार्थ विक्रेत्यांची तपासणी करीत आहेत. विक्रेत्यांकडील परवान्याचीही तपासणी केली जात आहे. विक्रेत्यांकडील खाद्यपदार्थ मुदतबाह्य आहेत का, यावरही पथकांची बारकाईने नजर आहे.

विक्रेत्यांनी शिळे खाद्यपदार्थ विकू नयेत, अशी सक्त ताकीद प्रशासनाने केली आहे. त्याचबरोबर दुग्धजन्य पदार्थ योग्य तापमानात साठवून ठेवावेत आणि चांगल्या प्रतीच्या खाद्यतेलाचा वापर करावा, अशीही सूचना करण्यात आली आहे.आषाढी वारीच्या मार्गावर पुण्यापासून पंढरपूरपर्यंत अन्न व औषध प्रशासनाची पथके खाद्यपदार्थांची तपासणी करणार आहेत.

वारकऱ्यांना अन्नातून विषबाधा होऊ नये, यासाठी काळजी घेतली जात आहे. आषाढी यात्रेवेळी पंढरपूरमध्ये २० ते २५ अधिकारी तैनात असतील आणि ते यात्रेच्या काळात खाद्यपदार्थांची तपासणी करतील. ही पथके रस्त्यांवरील खाद्यपदार्थांच्या गाड्या आणि हॉटेलांची तपासणी करीत आहेत. आषाढी वारी ही पावसाळ्यात असल्यामुळे खाद्यपदार्थ दूषित होण्याची शक्यता असते. त्यामुळे अन्नातून विषबाधा होण्याचा धोका वाढतो. या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाने तपासणीसाठी तीन पथके नियुक्त केली आहेत. यातील प्रत्येक पथकामध्ये सहा अधिकाऱ्यांचा समावेश आहे. ही पथके पालखी मार्गावरील खाद्यपदार्थ विक्रेत्यांची तपासणी करीत आहेत. त्यात खाद्यपदार्थ बनविताना स्वच्छता बाळगण्यात येत आहे का, याची तपासणी केली जात आहे. याचबरोबर खाद्यपदार्थांचे नमुने घेऊन ते तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात येत आहेत.वारीच्या मुक्कामाच्या ठिकाणी अन्न व औषध प्रशासनाची पथके तैनात करण्यात आली आहेत.

### विक्रेत्यांनी शिळे खाद्यपदार्थ विकू नये

ही पथके रस्त्यांवरील खाद्यपदार्थ विक्रेत्यांची तपासणी करीत आहेत. विक्रेत्यांकडील परवान्याचीही तपासणी केली जात आहे. विक्रेत्यांकडील खाद्यपदार्थ मुदतबाह्य आहेत का, यावरही पथकांची बारकाईने नजर आहे. विक्रेत्यांनी शिळे खाद्यपदार्थ विकू नयेत, अशी सक्त ताकीद प्रशासनाने केली आहे. त्याचबरोबर दुग्धजन्य पदार्थ योग्य तापमानात साठवून ठेवावेत आणि चांगल्या प्रतीच्या खाद्यतेलाचा वापर करावा, अशीही सूचना करण्यात आली आहे.आषाढी वारीच्या मार्गावर पुण्यापासून पंढरपूरपर्यंत अन्न व औषध प्रशासनाची पथके खाद्यपदार्थांची तपासणी करणार आहेत. वारकऱ्यांना अन्नातून विषबाधा होऊ नये, यासाठी काळजी घेतली जात आहे.

# बॅटरी निर्मितीसाठी संशोधन केंद्र

## एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचा पुढाकार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शाश्वत ऊर्जा उपाययोजनेच्या दृष्टीने एमआयटी विश्वशांती विद्यापीठाने लिथियम आयन आणि सोडियम आयन तंत्रज्ञानावर लक्ष केंद्रित करण्यासाठी अत्याधुनिक बॅटरी निर्मिती आणि संशोधन केंद्र स्थापन केले आहे. संपूर्ण बॅटरी विकसित करण्यासाठी या केंद्राची रचना करण्यात आली असून, त्यासाठीच्या अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत.**



विद्यापीठाने प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. गेल्या काही वर्षांत स्वच्छ ऊर्जा निर्मिती, पर्यायी इंधनासाठी जगभरात मोठ्या प्रमाणात संशोधन, प्रयोग करण्यात येत आहे. त्यात बॅटरी निर्मिती हा महत्त्वाचा घटक आहे. त्या अनुषंगाने बॅटरीच्या संपूर्ण विकासासाठी केंद्राची रचना करण्यात आली आहे. सक्रिय घटकांचे संश्लेषण, कॉइन सेल निर्मिती आणि इलेक्ट्रोकेमिकल कार्यक्षमतेचे मूल्यमापन अशा सर्व प्रक्रिया अंतर्गत पातळीवर पार पाडण्याची सुविधा या केंद्रात उपलब्ध आहे.बॅटरी निर्मिती व संशोधन सुविधा ही केंद्र सरकारच्या आत्मनिर्भर भारत आणि मेक इन इंडिया या योजनांना पूरक ठरू शकणार आहे. खासगी राज्य विद्यापीठात पहिल्यांदाच अशी सुविधा सुरू करण्यात आली आहे.

या केंद्राची स्थापना हा शाश्वत ऊर्जा तंत्रज्ञानाबाबतचा महत्त्वाचा टप्पा आहे. लिथियम-आयन, सोडियम-आयन आणि लिथियम-सल्फर बॅटऱ्यांसाठी प्रगत इलेक्ट्रोड साहित्य या केंद्रात विकसित करण्यात येत आहे. तसेच एमआयडी स्वीडनच्या सहकार्याने कागदी बॅटऱ्यांवरही संशोधन सुरू करण्यात आले आहे. या सुविधेमुळे शैक्षणिक, औद्योगिक सहकार्याला चालना मिळण्यासह भावी तंत्रकुशल मनुष्यबळ मिळणार आहे. राष्ट्रीय संस्थांकडून सहकार्य मिळाल्यास स्वच्छ ऊर्जा निर्मितीसाठी अधिक योगदान देणे शक्य आहे, असे विद्यापीठाच्या सेंटर ऑफ एक्सलन्स इन मटेरियल्स सायन्सचे संचालक डॉ. भारत काळे यांनी सांगितले. विद्यापीठाने प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. गेल्या काही वर्षांत स्वच्छ ऊर्जा निर्मिती, पर्यायी इंधनासाठी जगभरात मोठ्या प्रमाणात संशोधन, प्रयोग करण्यात येत आहे. त्यात बॅटरी निर्मिती हा महत्त्वाचा घटक आहे. त्या अनुषंगाने बॅटरीच्या संपूर्ण विकासासाठी केंद्राची रचना करण्यात आली आहे. सक्रिय घटकांचे संश्लेषण, कॉइन सेल निर्मिती आणि इलेक्ट्रोकेमिकल कार्यक्षमतेचे मूल्यमापन अशा सर्व प्रक्रिया अंतर्गत पातळीवर पार पाडण्याची सुविधा या केंद्रात उपलब्ध आहे.बॅटरी निर्मिती व संशोधन सुविधा ही केंद्र सरकारच्या आत्मनिर्भर भारत आणि मेक इन इंडिया या योजनांना पूरक ठरू शकणार आहे. खासगी राज्य विद्यापीठात पहिल्यांदाच अशी सुविधा सुरू करण्यात आली आहे.

### तंत्रकुशल मनुष्यबळ मिळणार

लिथियम-आयन, सोडियम-आयन आणि लिथियम-सल्फर बॅटऱ्यांसाठी प्रगत इलेक्ट्रोड साहित्य या केंद्रात विकसित करण्यात येत आहे. तसेच एमआयडी स्वीडनच्या सहकार्याने कागदी बॅटऱ्यांवरही संशोधन सुरू करण्यात आले आहे. या सुविधेमुळे शैक्षणिक, औद्योगिक सहकार्याला चालना मिळण्यासह भावी तंत्रकुशल मनुष्यबळ मिळणार आहे.


# हिंजवडीसह माण, मारुंजी गावांसाठी हवे स्वतंत्र प्राधिकरण !

## खासदार सुप्रिया सुळे यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**हिंजवडी येथील राजीव गांधी आयटी पार्क, माण, मारूंजी आणि परिसरातील पायाभूत सुविधांच्या संदर्भाने येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी स्वतंत्र प्राधिकरण स्थापन करण्याची मागणी खासदार सुप्रिया सुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. या भागामध्ये ये जा करणारा नोकरदार वर्ग तसेच येथील स्थानिक नागरिक या सर्वांचा विचार करता तातडीने मूलभूत सुविधा मिळणे गरजेचे आहे असे देखील सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे.**




सुप्रिया सुळे, खासदार (लोकसभा)

याबाबत दिलेले पत्रामध्ये सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे, बारामती लोकसभा मतदारसंघातील हिंजवडी परिसरात जागतिक दर्जाचे 'राजीव गांधी आयटी पार्क' आहे. येथे माहिती तंत्रज्ञान क्षेत्राशी संबंधित असणाऱ्या जगभरातील अग्रगण्य कंपन्या आहेत. देशातील महत्वाच्या आयटी पार्कमध्ये याचा समावेश होते.

येथील पायाभूत सुविधांची जबाबदारी घेणारी कोणतीही निश्चित अशी यंत्रणा नाही. त्यामुळे अनेकदा एमआयडीसी, महापालिका पुणे किंवा पिंपरी चिंचवड, पीएमआरडीए, महावितरण, मेट्रो, पोलीस अशा विविध आस्थापनांकडे यासंदर्भातील तक्रारी द्याव्या लागतात. बरेचदा त्या एकमेकांशी संबंधित असल्याने त्या सोडविणे तुलनेने अधिक जटील होऊन बसते. यामुळे अलिकडच्या काळात रस्ते, वीज, पाणी यांसारख्या सुविधांच्या संदर्भाने काही गंभीर अडचणी निर्माण झाल्या आहेत. याखेरीज या परिसरातील वाहतूक तसेच आयटी कर्मचारी, नागरीक यांना येथे सुरक्षित वातावरण निर्माण करुन देणे देखील आवश्यक आहे. या सर्व मुद्यांचा विचार करता त्या सोडविण्यासाठी विविध आस्थापनांकडे सातत्याने पाठपुरावा करावा लागतो. परिणामी त्यासाठी लागणारा वेळ देखील जास्त आहे. याचा नागरीकांना सर्वाधिक त्रास सहन करावा लागतो, ही वस्तुस्थिती आहे. 'राजीव गांधी आयटी पार्क'चे जागतिक व्यापार नकाशावरील स्थान लक्षात घेतले तर येथे अशा पद्धतीच्या अडचणी निर्माण होणे खेदजनक आहे.

### सक्षम अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र प्राधिकरण

हिंजवडीसह माण, मारुंजी या गावांमधील पायाभूत सुविधा आणि त्याच्याशी संबंधित इतर मुद्दे मार्गी लावण्यासाठी राजीव गांधी आयटी पार्क, हिंजवडी, माण, मारुंजी यांचा समावेश करुन येथे सक्षम अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली एक स्वतंत्र प्राधिकरण स्थापन करावे. या माध्यमातून या भागातील अडीअडचणी सोडविणे अधिक सोपे होईल. शिवाय त्यासाठी लागणारा वेळ देखील वाचेल. परिणामी या भागातील नागरिकांनाही त्याचा जास्तीत जास्त फायदा होईल.

---

# महापालिका निवडणुकांसाठी कामाला लागा - सपकाळ

## मुंबईमध्ये शहर काँग्रेसची आढावा बैठक; निवडणुकांच्या दृष्टीने कामाला लागण्याच्या सूचना

### निवडणुकांच्या दृष्टिकोनातून पदाधिकारी, कार्यकर्त्यांचे संघटन मजबूत करण्याच्या सूचना

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकांच्या दृष्टिकोनातून पदाधिकारी, कार्यकर्त्यांचे संघटन मजबूत करा. नागरिकांना काँग्रेसची ध्येय धोरणे, आजवर केलेल्या अनेक चांगल्या योजना, राबवलेले उपक्रम यांची माहिती द्या महापालिका निवडणुकांच्या दृष्टीने कामाला लागा अशा सूचना महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केल्या.**





मुंबई टिळक भवन येथे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या अध्यक्षतेखाली पिंपरी चिंचवड शहर काँग्रेसची महानगरपालिका निवडणूक आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये पिंपरी चिंचवड शहर काँग्रेस मधील तिन्ही विधानसभानिहाय प्रत्येक प्रभागाची माहिती अध्यक्षांना देण्यात आली. शहर काँग्रेसच्या वतीने गेल्या तीन वर्षांमध्ये राबवलेल्या विविध उपक्रमांची माहिती प्रदेशाध्यक्ष यांना देण्यात आली.

सन २०१७ च्या प्रभाग रचनेनुसार ३२ प्रभाग व १२८ नगरसदस्य आहेत. या सर्व प्रभागांमध्ये बूथ स्तरावर मतदार नोंदणी करून काँग्रेस पक्षाच्या वतीने इच्छुक उमेदवारांनी शहर काँग्रेसच्या वतीने दिलेले उपक्रम राबवावे व तसेच महापालिकेच्या भ्रष्ट कारभाराविरोधात आंदोलने उभी करावीत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये जास्तीत जास्त सदस्य निवडून आणण्यासाठी काँग्रेसचा प्लॅन तयार आहे, त्याप्रमाणे सर्व पदाधिकाऱ्यांनी, कार्यकर्त्यांनी या निवडणुकीसाठी सज्ज राहावे. तसेच प्रदेश स्तरावरून निरीक्षकांच्या मार्फत व स्थानिक नेतृत्वात विश्वासात घेऊन उमेदवारीचा विचार केला जाईल, असे आपल्या मार्गदर्शनात प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितले.या बैठकीत पक्षाच्या आगामी रणनीतीवर सखोल चर्चा झाली. मतदार नोंदणी मोहिमेचे नियोजन, संघटनात्मक बांधणीचे मजबूतीकरण आणि प्रचार कार्यतंत्रात नवसंजीवनी देण्यासाठी विविध उपाययोजना सादर करण्यात आल्या. पक्षाच्या कार्यपद्धतीला अधिक प्रभावी करण्यासाठी अनेक सूचनांची देवाणघेवाण झाली. या बैठकीत पक्षाच्या आगामी रणनीतीवर सखोल चर्चा झाली. मतदार नोंदणी मोहिमेचे नियोजन, संघटनात्मक बांधणीचे मजबूतीकरण आणि प्रचार कार्यतंत्रात नवसंजीवनी देण्यासाठी विविध उपाययोजना सादर करण्यात आल्या. पक्षाच्या कार्यपद्धतीला अधिक प्रभावी करण्यासाठी अनेक सूचनांची देवाणघेवाण झाली.

### या बैठकीस या पदाधिकाऱ्यांची प्रामुख्याने उपस्थिती...

या बैठकीस शहराध्यक्ष डॉ. कैलास कदम, प्रदेश उपाध्यक्ष ॲड. गणेश पाटील, माजी नगरसेवक बाबू नायर, अशोक मोरे, मनोज कांबळे, अभिमन्यु दहितुले, कौस्तुभ नवले, तुषार पाटील, मयूर जयस्वाल, ॲड.अनिरुध्द कांबळे, विश्वनाथ जगताप, विठ्ठल शिंदे, सज्जी वर्की, सोमनाथ शेळके, हिरामण खवळे, बाबासाहेब बनसोडे, अबूबकर लांडगे, गौरव चौधरी, निर्मला खैरे, प्रियंका कदम, दीपाली भालेराव, गौरी शेलार, जॉर्ज मॅथ्यू, उमेश बनसोडे, चंद्रकांत लोंढे, भरत वाल्हेकर, विशाल सरवदे, रवि नांगरे, निखिल भोईर, राहुल शिंपले, मिलिंद फडतरे, कुंदन कसबे, भिमराव जाधव, विजय ओव्हाळ, झेव्हिअर अँथोनी, गौतम ओव्हाळ, युनूस बागवान, विकास कांबळे, दिनकर भालेराव, शशी नायर, आबा खराडे, आशुतोष खैरे, प्रवीण कांबळे, इरफान शेख, अमित मोरे, गणेश बंदपट्टे, साहिल पवार आदींसह काँग्रेस पदाधिकारी उपस्थित होते.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### ज्याला प्रपंच नाही करता आला। त्याचा परमार्थ ढिला पडला।।

मातापिता यांचे न पाहावे दोष । हे सत्पुत्राचे लक्षण सत्य ॥ माता-पितरांचे समाधान । हेच सुपुत्राचे खरे लक्षण जाण ॥ त्यांचे राखून समाधान । जे करणे असेल ते करावे जाण ॥ आईचे अंत:करण अत्यंत कोवळे असते । आपले दु:खीपणाने ते दु:खी होते । आपली आनंदी वृत्ति आईला आनंदी बनविते । म्हणून मुलांनी असावे नेहमी आनंदात । काहूर न माजू द्यावे चित्तात ॥ शब्दाने करावे त्यांचे समाधान । उत्तरी अपशब्दाचे न मानावे दु:ख जाण ॥ नोकरी चाकरी उद्योग धंदा । पोटाकरिता करणे आहे सदा ॥ आपण पैका मिळवावा पुष्कळ । पण ते सुखाचे साधन न मानावे सकळ ॥ प्रपंचात नुकसान होईल असे काम करू नये । तसे शब्द बोलू नये ॥ आल्या अतिथा अन्न द्यावे । कोणास विन्मुख न पाठवावे ॥ निरुत्साही बनू नये । निराश वाटू देऊ नये ॥ अगदी व्यवहाराच्या मार्गाने जावे । त्यात रामाचे अधिष्ठान राखावे॥ ज्याला प्रपंच नाही करता आला । त्याचा परमार्थ ढिला पडला ॥ प्रपंचाची काळजी । हीच परमार्थाला वाळवी ॥ परमात्म्याचा आधार ज्याला । ठाव नसे काळजीला ॥ शेजार असता रामाचा । दु:खाची, काळजीची, काय वार्ता ? ॥ मी कोण हे जाणले ज्याने चित्ती । त्याला काळजी न राहे अशी होईल वृत्ति ॥ राम त्राता हा भाव ठेवावा चित्ती । निर्भयता होईल याच रीती ॥ ज्याने देह केला रामाला अर्पण । त्याला नाही काळजीचे कारण ॥ कर्ता राम हे आणता चित्ती । पापपुण्याची नाही त्याला भीति ॥ ज्याचा परमात्मा झाला सखा । त्याला नाही कोठे धोका ॥ ‘ कर्ता मी ’ म्हणे आपण । हे सर्व दु:ख-काळजीचे कारण ॥ झाले ते होऊन गेले । होणार ते चुकेना कोणाला भले ॥ म्हणून नाही करू काळजीला । राम साक्षी आहे त्याला ॥ जे जे काही माझे । ते ते जाणावे रामाचे ॥ राम त्यास सांभाळता । काळजीस कारण न उरले आता ॥ मुलाबाळांची न करावी काळजी । रामराय करावा राजी॥ आपला प्रपंच हा रामाचा जाणून चित्तीं । काळजी चिंता करणे ही योग्य नाही रीति ॥ शक्य तो करावे नामस्मरण । आपली काळजी न करावी आपण ॥ रामाचा म्हणून प्रपंच केला । काळजीचे कारण उरत नाही आपल्याला॥ भगवंत असता पाठीराखा । काळजीची काय कथा ? ॥ म्हणून, मुखाने नाम, चित्तांत राम, । त्याचे मनाला होईल आराम ॥ सतत ठेवावे एक चित्तीं । न सोडावा रघुपति ॥ सर्व सारांचे सार । एक भजावा रघुवीर ॥ नेमात नेम उत्तम जाण । रामावाचून न राहावे आपण ॥

**बोधवचन:- सर्व कर्ता राम। हा भरवसा ठेवावा ठाम। मग काळजीचे उरले नाही काम।।**



**'स्टेट'मेंट**

**अधिकराव दिवे-पाटील**
संस्थापक, संपादक

**हिंदी भाषेची सक्ती केली नसताना आधीच राजकीय गदारोळ उठला आहे. वरवर पाहता, हा विरोध साप साप करत भुई थोपटण्याचा प्रकार वाटतो. जे स्वतः किंवा त्यांचे संपूर्ण खानदान इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधून शिकले, पदवीधर झाले, त्यांनाच मराठीचा जास्त पुळका आलेला आहे, हे स्पष्ट दिसते ! म्हणूनच म्हणावेसे वाटते, हिंदीबाबत कोणाला भक्ती आहे? कोणाची युक्ती आहे, कोणाची सक्ती आहे तर कोणाची शक्ती आहे! राजकीय फासे तर सगळ्यांनीच टाकले आहेत. या वादग्रस्त मुद्द्यावर कोणाला ताकद मिळणार, आणि शेवट काय होणार? हे आगामी काळच ठरवणार आहे !**

# भाषेची सक्ती की नुसतीच भक्ती? कोणाची शक्ती ? कोणाची मुक्ती!




### हिंदीविरोधात आक्रमक भूमिका..

हिंदी भाषा तिसरी भाषा म्हणून सक्तीची होणार, या एका विचाराने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आणि त्यांच्या पक्षाने हिंदी विरोधात मोहीम सुरु केली आहे. हे लोण किती पुढे जाईल, मुद्दा किती पेटवला जाईल आणि त्यावर कोणकोणते पक्ष आपली राजकीय पोळी भाजतील, हे आता लक्षवेधी आहे. मुळात नवीन शैक्षणिक धोरण आता मान्य केले गेले आहे. त्यानुसार या वर्षापासून काही वर्गांना शिकवणे सुरु झाले आहे. सर्व देशाने, त्यात आपले राज्यही आलेच, जर नवे शैक्षणिक धोरण मान्य केले असेल, तर आता त्या विरोधात ओरडून काय साध्य होणार ?

### बैल गेल्यावर झोपा केला..

हे धोरण जाहीर झाल्याबरोबर याचा ठाम विरोध केला पाहिजे होता. मात्र, ते झाले नाही. नेहमीप्रमाणे, बैल गेल्यावर झोपा करण्याचे काम राज ठाकरे करत आहेत. देवेंद्र फडणवीस आणि त्यांचे बोलणे झाले त्यानुसार राज ठाकरे यांचा तिसऱ्या भाषेलाच विरोध आहे. तिसरी भाषा ज्याला, ज्यावेळी शिकायची तेव्हा शिकू दे, पहिली पासून सक्ती का? या मुद्यांवर चर्चा झाल्याचे फडणवीस सांगत आहेत. बंद खोलीतल्या चर्चा त्रासदायक ठरतात, हा अनुभव असताना फडणवीस पुन्हा राज ठाकरे यांना एकटे का भेटले, हे समजत नाही. राज ठाकरे यांना केवळ राजकारणासाठी हा विषय पाहिजे असेल तर या विषयावर अजून बैठका होतील आणि तडजोड झाल्यावर प्रश्न सुटेल. या ठिकाणी सक्ती पेक्षा भक्ती महत्वाची आहे, हे लक्षात घ्या !

### १९६१ मध्ये त्रिभाषिक सूत्राबाबत एकमत!

१९६१ मध्ये देशातील प्रमुख राज्यांच्या अनेक मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत एकमत झाले. ज्यामुळे त्रिभाषिक सूत्राची अंमलबजावणी झाली. त्रिभाषिक सूत्र हे देशाच्या विकसनशील ज्ञानाच्या पायाभूत आणि भावनिक एकात्मतेच्या तपासणीसाठी एक उपयुक्त सुरुवात होती. भाषा शिक्षणावरील ध्येय किंवा निबंधापेक्षा बहुभाषिकतेला चालना देण्यासाठी आणि राष्ट्रीय एकता मजबूत करण्यासाठी शिक्षणाच्या धोरणात त्रिभाषिक सूत्राचा पुरस्कार करण्यात आला आहे. या कृतीमुळे संपूर्ण भारतात तीन भाषा सूत्रे योग्य आहेत की नाही यावरील वाद पुन्हा सुरू झाला आहे.

### तामिळनाडूने सूत्र नाकारले..

तामिळनाडूच्या मुख्यमंत्र्यांनी मात्र हे सूत्र नाकारले आणि या संवेदनशील आणि राजकीय विषयावर राज्याच्या ठाम भूमिकेला पुन्हा पुष्टी दिली. १९६८ च्या राष्ट्रीय शिक्षण धोरणात त्रिभाषिक सूत्र सादर करण्यात आले. म्हणजेच हिंदी आणि इंग्रजी व्यतिरिक्त, एक तिसरी भाषा असावी, जी आधुनिक भारताचा एक भाग आहे आणि हिंदीभाषिक राज्यांमध्ये शिक्षणासाठी वापरली पाहिजे, असे सर्वानुमते ठरले. त्यानंतर शिक्षणासाठीचा कोठारी आयोग, तर तीन भाषा सूत्रासाठी स्व. राजीव गांधी, स्व. नरसिंहराव आणि अखेरीस २०२० मधील शाळातील नवीन शिक्षण धोरण असे प्रवास ठळकपणे झाले, हे शिक्षणतज्ज्ञांनाही माहीत आहे.

### धर्म, भाषा, प्रांताचे राजकारण..

धर्म, भाषा आणि प्रांत यावरून राजकारण करणे सोपे असते. मूलभूत संकल्पना समजावून न घेता जनभावना भडकवल्या की राजकीय पक्ष, त्यांचे नेते यांचे महत्व वाढते, हे राज ठाकरे यांना माहीत आहे. वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या तालमीत तयार झालेले राज ठाकरे आज मराठी हा भाषा विषय घेऊन राजकारणात स्थिर होऊ पाहात आहेत. महानगरपालिकेची निवडणूक हे त्यांचे उद्दिष्ट आहे. शिवसेनेची स्थापना मराठी माणूस, मग हिंदू धर्म अशा मार्गानेच गेली. ती वंदनीय बाळासाहेब यांनी नीट चालवली. राज ठाकरे यांना अद्याप राजकारण आणि समाजकारणात तो आवाका नक्कीच आलेला नाही. तो येण्यासाठी त्यांचा प्रयत्न आहे.

### अंमलबजावणीत विसंगती..

जरी तीन भाषासूत्रात मातृभाषेची भाषा शिकवण्याची परवानगी आहे, तरीही अंमलबजावणीत विसंगततेमुळे त्यावरचा भार कमी होत आहे. प्रमुख वांशिक गटांच्या राजकीय हक्कांचे रक्षण करताना, विविध मातृभाषांचे विलोपन रोखण्यात हा दृष्टिकोन कमी पडतो. काही ठिकाणी विद्यार्थ्यांसाठी संस्कृतचा अभ्यास अनिवार्य आहे. यातून आपल्याला मार्ग काढावा लागणार आहे. त्रिभाषिक सूत्रामुळे आता विद्यार्थ्यांवर विषयांचा भार वाढला आहे. हा मुद्दा योग्य आहे. मात्र, अभ्यासक्रम सुलभ केला आणि केवळ संवाद माध्यमातून तो राहिला, तर भार वाटणार नाही. तसेही लहान मुले हिंदी सहज बोलतातच की !

### हिंदीचा बाऊ कशासाठी ?

दूरदर्शन वाहिन्यांमुळे हिंदीची भीती ही त्यांना नाही. त्यामुळे या भाषेचा बाऊ करण्याचे कारण नाही. सुमारे ५४ टक्के भारतीय हिंदी बोलू शकतात, या गृहीतकावर आधारित धोरणाचा मसुदा हिंदीला दिलेल्या पाठिंब्यावर अवलंबून असल्याचे दिसून येते. त्यामुळे हिंदीला भारताची अधिकृत भाषा बनवण्यासाठी अधिक दबाव आला आहे, ज्याला अनेक राज्ये, विशेषतः दक्षिणेकडील राज्ये, हिंदी लादणे म्हणून पाहतात, हे खरेच आहे !

### काही राज्यांचा स्पष्ट नकार..

त्रिपुरा, तामिळनाडू आणि पुडुचेरीसारखी राज्ये हिंदी शिकवण्यास तयार नव्हती, तर हिंदी बोलणाऱ्या राज्यांनी त्यांच्या अभ्यासक्रमात कोणत्याही दक्षिण भारतीय भाषांचा समावेश केला नव्हता. भारतासारख्या खंडप्राय, बहुभाषिक देशात हा विषय धुमसत राहणारच..लोकशाही असल्याने मतमतांतरे होत राहणारच.. मात्र, भाषाविषयक एकवाक्यता, राष्ट्रीय भाषा याबाबत निर्णय घ्यावाच लागणार आहे. राज्यात भाषाविषयक शिक्षणात जे धोरण आखले गेले आहे, केंद्राने ज्या सूचना केल्या आहेत, त्याचा विचारही केलाच पाहिजे. मुळात मराठी भाषा आपण किती जिवंत ठेवतो, त्याकरता किती प्रयत्न करतो याचा विचार केला पाहिजे. मराठीचा पुरस्कार करत असताना हिंदीचा तिरस्कार करणे, मुळीच योग्य नाही ! म्हणूनच कोणत्याही भाषेची सक्ती नको.. भक्ती तर नकोच नको !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.




# पघातानंतरची सतर्कता किती टिकेल?

**अहमदाबादमध्ये एअर इंडियाच्या विमान अपघातात सुमारे तीनशे निष्पाप नागरिकांचा बळी गेल्यानंतर अखेर सरकार आणि विमानवाहतूक कंपन्या ‘शुद्धीवर’ आल्या. अपघाताच्या दुसऱ्याच दिवशी एअर इंडियाच्या सात आंतरराष्ट्रीय उड्डाणांना रद्द करण्यात आलं.**

इतर विमान कंपन्यांच्याही वैमानिकांनी सुरक्षा मानकांची काटेकोर अंमलबजावणी करण्यास सुरुवात केल्याने अनेक उड्डाणे रद्द झाली किंवा परत वळवावी लागली.पण हा बदल अचानक का? याचं उत्तर आहे – स्मशान वैराग्य! चितेची उष्णता संपेपर्यंत सगळेच आत्मपरीक्षणाची भाषा करतात आणि राख थोडीशी थंड झाली की पुन्हा सगळं जसंच्या तसं होतं. ही घटना विमान अपघाताची असल्यामुळे प्रकाशझोतात राहिली. पण देशभरात बस, रेल्वे, रस्ते, धार्मिक उत्सव किंवा आरोग्य सेवांमधून नियमितपणे घडणाऱ्या अपघातांत दरवर्षी हजारो लोक जीव गमावतात. दुर्दैवाची बाब म्हणजे अशा घटनांची आकडेवारी दडपण्यावरच नेहमी भर असतो. उदाहरणच द्यायचं झालं तर, कुंभमेळ्यातील चेंगराचेंगरीची खरी मृतसंख्या ही सरकारी आकडेवारीपेक्षा तब्बल अडीच पट अधिक होती, हे अलीकडच्या एका अहवालात उघड झालं. कोरोना काळातही




भारत सरकारने सादर केलेली आकडेवारी ‘वास्तवापासून कोसों दूर’ होती, असे अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांचे नंतरचे विश्लेषण होते. उत्तर प्रदेशातील कुंभदरम्यान गंगेत वाहणाऱ्या मृतदेहांचा उल्लेख करणंही सरकारने टाळलं! प्रश्न असा की, जोपर्यंत आपण एखाद्या दुर्घटनेला दुर्घटना म्हणून मान्यता देत नाही, तोपर्यंत तिच्या निराकरणाची प्रक्रिया कशी सुरू होणार?रेल्वे अपघातांचंही चित्र वेगळं नाही. कित्येक अपघातांनंतर सुरक्षेसाठी आवश्यक तंत्रज्ञान केवळ कागदावरंच आहे. निर्णय झालेले असले तरी त्याची अंमलबजावणी अत्यंत संथ गतीने होते. काही निवडक मार्ग सोडले तर इतरत्र प्रवाशांचा जीव अजूनही टांगणीलाच लागलेला असतो. रस्त्यांवरील स्थिती तर आणखीनच भयावह, खड्ड्यांचे साम्राज्य, वाहतुकीचा गोंधळ, मोकाट जनावरे, मद्यधुंद चालक – आणि तरीही कारवाई नगण्य. विमानप्रवास करणारा वर्ग तुलनेने उच्चभ्रू असल्याने त्यांच्या सुरक्षेची काळजी घेतली जाते. पण ट्रेन व बसने प्रवास करणाऱ्यांची अवस्था, शशी थरूर यांच्या भाषेत, ‘कॅटल क्लास’सारखीच. गर्दी, घाण, अपमान सहन करतच प्रवास. मुंबईसारख्या ‘देशाच्या आर्थिक राजधानी’तही, लोक दरवाज्यांवर लटकून प्रवास करतात आणि तसंच करताना काहींचा मृत्यू होतो. ते दृश्य पाहून हे वाटतच नाही की हे प्रवासी करदाते आहेत. वाटतं जणू कुठल्या प्रसादासाठी झगडत आहेत. आणि अशा घटनांनंतर सरकार काही काळ जागं होतं. घोषणा होतात, समित्या बसतात, पण लवकरच सामूहिक विस्मृतीचा भडका उसळतो. लोकशाहीमध्ये नागरिकांची सुरक्षितता ही सर्वोच्च प्राथमिकता असायला हवी, पण भारतात लोकसंख्या इतकी प्रचंड की मृत्यूही फक्त आकडेच बनून राहतात. सरकारला त्याची आठवण करून द्यायला एखादा बाबा रामदेव किंवा बागेश्वर बाबा काहीतरी बोलतो आणि लगेचच माध्यमांचं लक्ष वळतं, सरकारला हायसं वाटतं! या देशातील सरकारं म्हणजे जणू जनतेच्या स्मृतीसारखी, निवडणूक ते निवडणूक एवढाच कालावधी.

आज सार्वजनिक सेवांचं वेगाने खासगीकरण सुरू आहे. रेल्वे स्थानकं, विमानतळ, रुग्णालयं- तिथे आता सुरक्षा नव्हे, तर महसूल वाढवणं हेच उद्दिष्ट आहे. नियम पाळले तर व्यवहार ठप्प होतो, म्हणून ते प्राधान्य यादीतही नसतात. हे फक्त भारतापुरतंच नाही, ही जागतिक प्रवृत्तीच झाली आहे. औषध कंपन्या, बांधकाम क्षेत्र, विमान उत्पादक सगळीकडे सुरक्षा नियमांचा हलगर्जीपणा अब्जावधींच्या फायद्यासाठी केला जातो. लॉबिंग आणि सौदेबाजी हेच आधुनिक उद्योगांचे ‘धर्म’ झाले आहेत.टाटांनी नुकतीच अत्यवस्थ स्थितीत असलेली एअर इंडिया खरेदी केली. आता या विमानांची सुरक्षा सरकारच्या संस्थांच्या हातात आहे. तर त्यावर प्रश्न विचारणाऱ्यांचेच तोंड बंद करण्याचा अलिखित संकेत चालतो. सध्याचा हा सतर्कतेचा टप्पा किती दिवस टिकेल, हे पाहणं औत्सुक्याचं ठरेल. अहमदाबादच्या घटनेमुळे हवाई प्रवासी केंद्रस्थानी आले.

## संपादकीय »

# अखंड भारत हेच उत्तर!

***आपल्या घरामध्ये, संघटनेमध्ये वा पक्षामध्ये कोणास प्रवेश द्यावयाचा आणि कोणास नाकारायचा तो संबंधित व्यक्ती वा संघटना/ पक्ष यांच्या धुरीणांचा निर्णय.***

इतरांस पडावयाचे कारण नाही. घरातील वा संघटना/ पक्षातील अन्य कोणास नव्या येणाऱ्याबाबत काही आक्षेप नसेल तर त्यावर इतरांनी भाष्य करण्याची गरज नाही. हे तत्त्व आणि हा युक्तिवाद बिनतोड. तेव्हा जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष असलेल्या भारतीय जनता पक्षाचे पान कोणा नवनवीन गणंगापासून हलत नसेल आणि एकापेक्षा एक नामचीन मान्यवरांस आपल्या पक्षात घेण्याची गरज त्या पक्षात वाटत असेल तर इतर राजकीय पक्ष वा व्यक्तींस त्याची उठाठेव करण्याची आवश्यकता नाही हेही मान्य. तरीही भाजपत जाणाऱ्या नव्या नामचिनांच्या प्रवेशाची दखल घ्यावी लागते. ती का? तसे पाहू गेल्यास सुधाकर बडगुजर वा बबन घोलप या गणंगोत्तमांची दखल सोडा, पण त्यांचे नामोल्लेखसुद्धा या स्तंभात करावेत असा त्यांचा लौकिक नाही. हे क्षुद्र जीव काय करतात याच्याशी अजिबात देणेघेणे नाही.

**जागतिक भू-राजकारण हे सध्या वर्चस्ववाद आणि शून्यवादाच्या जीवघेण्या विळख्यात सापडले आहे. अलीकडच्या इतिहासात जागतिक नेतृत्वामध्ये कार्यक्षमता आणि नैतिक गांभीर्य यांचा अभाव इतक्या तीव्रतेने कधीच जाणवला नव्हता. पहिल्यांदा वर्चस्ववादाकडे पाहू. आपण अमेरिका आणि इस्रायल यांच्यातील धोरणात्मक मतभेद मान्य केले, तरीदेखील गाझा आणि अलीकडील इराणमधील युद्ध ही पश्चिमी वर्चस्ववादाचा थेट अविष्कार आहेत.**

# कुठे आहे समर्थ जागतिक नेतृत्व?

थोडक्यात सांगायचे तर इस्रायलची गाझा आणि इराणमधील आक्रमकता ही पश्चिमी वर्चस्ववादाची पुनरावृत्ती आहे. आणि बहुध्रुवीय जागतिक व्यवस्था ही संकल्पना निव्वळ एक भ्रम ठरली आहे. स्थानिक संदर्भ वेगवेगळे असले तरी, अलीकडच्या काळातील संघर्षांमधून असं दिसून येतं की जागतिक व्यवस्थेत सध्या कोणतेही संतुलन शिल्लक राहिलेलं नाही. रशिया आणि चीन यांचं प्रभावक्षेत्र आधीच मर्यादित आहे. त्यात इस्रायल इराण या युद्धात इराणचा पराभव झाला तर, पाश्चिमात्य वर्चस्वाला आव्हान देण्याची रशिया आणि चीन यांची क्षमता आणखी क्षीण होईल. सौदी अरेबियासह पश्चिम आशियातील प्रमुख देशांनी पॅलेस्टाईन किंवा इराणच्या मुद्द्यावर पाश्चिमात्य देशांबरोबरचे संबंध बिघडू नयेत, याची काळजी घेतलेली दिसते. दीर्घकालीन ऐतिहासिक दृष्टिकोनातून या युद्धाकडे



पाहिले, तर अमेरिकन प्रभुत्वाची पुन्हा मांडणी करण्याचा प्रयत्न त्यातून दिसतो.डोनाल्ड ट्रम्प या युद्धाचा वापर वर्चस्ववादी राजकीय कथ्य (नॅरेटिव्ह) पुढे रेटण्यासाठी करतील अशी शक्यता आहे. इराणमध्ये सत्ताबदलाची शक्यता वाटली, किंवा इराणची अण्वस्त्र क्षमता नष्ट करणे शक्य आहे, असं वाटलं तर ते या युद्धाला पाठिंबा देतील. अन्यथा, आपण कसे शांततेसाठी कसून प्रयत्न केले असं चित्र ते निर्माण करतील. पण यातलं काहीही झालं तरी त्यांना द्यायचा आहे तो मुख्य संदेश स्पष्ट आहे. तो म्हणजे जागतिक पातळीवरचं अमेरिकेचं अपरिहार्य स्थान, जगाला आपल्या इच्छेनुसार पुन्हा घडवण्याची ताकद, आणि इराक व अफगाणिस्तानातील अपमानांचा सूड घेण्याची धडपड. जागतिक सत्तेच्या बदलत्या गतिशीलतेशी पश्चिमेकडील देशांनी कधीही वैचारिक-तार्किकदृष्ट्या खऱ्या अर्थाने जुळवून घेतलेलं नाही. बेंजामिन नेतान्याहू यांच्यामध्ये, त्यांना प्रादेशिक विरोधकांना दूर करून वर्चस्व पुन्हा सिद्ध करण्याचे साधन सापडलं आहे.सध्याच्या काळातील शून्यवाद अत्यंत ठळकपणे अधोरेखित झाला आहे. सामूहिक विनाश आणि लोकांना होणाऱ्या त्रासाच्या पार्श्वभूमीवर, आपली नैतिक जाणीव जमातवादी वृत्तीने अंध झाली आहे. आपण कोणाची बाजू घ्यायची हे आपण आधीपासूनच ठरवलं आहे. ही भूमिका आपल्याला आपल्या डोळ्यांसमोर सुरू असलेलं क्रौर्यदेखील कसं योग्यच आहे, हे बौद्धिकतेच्या पातळीवर पटवून देते आणि संभाव्य धोक्यांकडे दुर्लक्ष करायला लावते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# औषध निर्माणशास्त्राच्या प्रवेशाचा मार्ग मोकळा!

## नवीन बदलासंदर्भात राज्य सरकारकडून अधिसूचना जारी

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**अभियांत्रिकी, औषधनिर्माण शास्त्र अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेत करण्यात येणाऱ्या महत्त्वपूर्ण बदलासंदर्भातील अधिसूचना शुक्रवारी राज्य सरकारने जाहीर केली. त्यामुळे या अभ्यासक्रमांसाठी राबविण्यात येणाऱ्या प्रवेश प्रक्रियेचा मार्ग मोकळा झाला असून, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून लवकरच प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक जाहीर होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.**



उच्च व तंत्रशिक्षण विभागाने अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेमध्ये बदल करून तीनऐवजी चार फेऱ्या घेण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार पहिल्या फेरीमध्ये प्रथम प्राधान्य, दुसऱ्या आणि तिसऱ्या फेरीमध्ये अनुक्रमे पहिले तीन व पहिले सहा महाविद्यालयांचे प्राधान्यक्रम बंधनकारक असणार आहेत. फेरीनुसार निश्चित केलेल्या प्राधान्यक्रमानुसार विद्यार्थ्यांनी त्या जागांवर प्रवेश न घेतल्यास त्यांचा त्या जागेवरील दावा आपोआप रद्द होईल. त्याचप्रमाणे हे विद्यार्थी पुढील फेरीसाठी पात्र ठरणार नाहीत.तसेच दुसऱ्या, तिसऱ्या आणि चौथ्या फेरीसाठी पात्र उमेदवारांना पुन्हा एकदा ऑनलाइन प्राधान्यक्रम भरण्याची किंवा त्यात बदल करण्याची मुभा देण्याचा निर्णय घेतल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी काही दिवसांपूर्वी दिली होती. मात्र त्यासंदर्भात कोणतीही अधिसूचना जारी करण्यात आली नसल्याने १६ जून रोजी एमएचटी सीईटीचा निकाल जाहीर होऊनही प्रवेश प्रक्रिया राबविण्यात अडचणी येत होत्या. मात्र राज्य सरकारने शुक्रवारी अधिसूचना जारी केल्याने प्रवेश प्रक्रिया राबविण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.अभियांत्रिकी प्रवेशासाठी आता तीनऐवजी चार केंद्रीभूत प्रवेश फेऱ्या होणार आहेत. तसेच पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या फेरीत अनुक्रमे एक, तीन आणि सहा पसंतीक्रमांचे महाविद्यालय मिळाल्यास, संबंधित विद्यार्थ्या त्या महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेणे बंधनकारक असणार आहे. चार फेऱ्या पूर्ण झाल्यानंतरच संस्थात्मक प्रवेश फेरी राबविण्यात येणार असून, या फेरीमध्ये गुणवत्ता यादी जाहीर करून गुणवत्तेनुसारच प्रवेश दिले जाणार असल्याची माहिती तंत्रशिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. विनोद मोहितकर यांनी दिली.संस्थात्मक फेरीमध्ये एखाद्या विद्यार्थ्यांने केलेला अर्ज संबंधित महाविद्यालयाच्या प्रशासनाने घेण्यास नकार दिला, तर विद्यार्थ्यांना सीईटी कक्षाच्या संकेतस्थळावर त्या महाविद्यालयाच्या संस्थात्मक फेरीसाठी अर्ज करता येणार आहे. महाविद्यालयाकडून जाहीर करण्यात येणाऱ्या गुणवत्ता यादीमध्ये त्या विद्यार्थ्यांच्या अर्जाचा समावेश असल्याने विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश मिळण्याचा मार्ग मोकळा होणार असल्याची माहिती डॉ. विनोद मोहितकर यांनी दिली.उच्च व तंत्रशिक्षण विभागाने अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेमध्ये बदल करून तीनऐवजी चार फेऱ्या घेण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार पहिल्या फेरीमध्ये प्रथम प्राधान्य, दुसऱ्या आणि तिसऱ्या फेरीमध्ये अनुक्रमे पहिले तीन व पहिले सहा महाविद्यालयांचे प्राधान्यक्रम बंधनकारक असणार आहेत. फेरीनुसार निश्चित केलेल्या प्राधान्यक्रमानुसार विद्यार्थ्यांनी त्या जागांवर प्रवेश न घेतल्यास त्यांचा त्या जागेवरील दावा आपोआप रद्द होईल. त्याचप्रमाणे हे विद्यार्थी पुढील फेरीसाठी पात्र ठरणार नाहीत. पुन्हा एकदा ऑनलाइन प्राधान्यक्रम भरण्याची किंवा त्यात बदल करण्याची मुभा देण्याचा निर्णय घेतल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी काही दिवसांपूर्वी दिली होती. मात्र त्यासंदर्भात कोणतीही अधिसूचना जारी करण्यात आली.

### प्रवेश प्रक्रिया राबविण्याचा मार्ग मोकळा

नसल्याने १६ जून रोजी एमएचटी सीईटीचा निकाल जाहीर होऊनही प्रवेश प्रक्रिया राबविण्यात अडचणी येत होत्या. मात्र राज्य सरकारने शुक्रवारी अधिसूचना जारी केल्याने प्रवेश प्रक्रिया राबविण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.अभियांत्रिकी प्रवेशासाठी आता तीनऐवजी चार केंद्रीभूत प्रवेश फेऱ्या होणार आहेत. तसेच पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या फेरीत अनुक्रमे एक, तीन आणि सहा पसंतीक्रमांचे महाविद्यालय मिळाल्यास, संबंधित विद्यार्थ्या त्या महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेणे बंधनकारक असणार आहे. चार फेऱ्या पूर्ण झाल्यानंतरच संस्थात्मक प्रवेश फेरी राबविण्यात येणार असून, या फेरीमध्ये गुणवत्ता यादी जाहीर करून गुणवत्तेनुसारच प्रवेश दिले जाणार असल्याची माहिती तंत्रशिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. विनोद मोहितकर यांनी दिली.

---

# पवारांची मुंबई पालिका निवडणुकीबाबत भूमिका

## आता निवडणुका लांबवता येणार नाहीत : शरद पवार

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर निवडणुकीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यासंदर्भात निवडणूक आयोगाला अधिसूचना जारी करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. तसेच, तीन महिन्यांच्या आत निवडणुका घेण्यासही सांगितले आहे.**



या पार्श्वभूमीवर एकीकडे निवडणूक प्रक्रियेची चर्चा असताना दुसरीकडे मुंबई महानगर पालिकेत राजकीय पक्ष आघाडीत लढणार की स्वतंत्र? यासंदर्भात सामान्य नागरिकांप्रमाणेच सर्वपक्षीय कार्यकर्त्यांमध्येही उत्सुकता आहे. याबाबत शरद पवार यांनी महत्त्वपूर्ण भूमिका मांडली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी आज पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत विविध राजकीय मुद्द्यांवर शरद पवारांनी भाष्य केलं. यावेळी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महाविकास आघाडीतील तीन प्रमुख मित्रपक्ष व इतर सहकारी पक्ष एकत्र लढणार की स्वतंत्र?

यासंदर्भात शरद पवारांना विचारणा करण्यात आली. त्यावेळी शरद पवारांनी एकत्र लढण्याची इच्छा असल्याचं मत व्यक्त केलं.अद्याप काहीही निर्णय घेतलेला नाही. आमचा अंदाज असा आहे की सर्वोच्च न्यायालयाने एक निकाल दिला आहे. का? यावर विचार करू. त्याबाबत अंतिम निर्णय करून आमची एकत्र निवडणूक लढवायची इच्छा आहे"

, असं शरद पवार यावेळी म्हणाले.दरम्यान, यंदाच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मुंबई महानगर पालिका निवडणुकीची जोरदार चर्चा पाहायला मिळत आहे. मुंबई महानगर पालिका निवडणुकीत महायुती व महाविकास आघाडी या दोन्ही प्रमुख आघाड्यांमध्ये स्वतंत्र की एकत्र? याबाबत चर्चा चालू आहे. महाविकास आघाडीत उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेसोबतच शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस व लोकसभा निवडणुकीत सर्वात मोठा पक्ष ठरलेला काँग्रेस आहे.

### काय म्हणाले शरद पवार?

. मात्र, मुंबईचा विचार करता उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेची ताकद जास्त असल्याचं शरद पवारांनी नमूद केलं आहे."मुंबईबाबत अजून काही चर्चा झालेली नाही. पण मुंबईत आमच्या सगळ्यांमध्ये अधिक शक्तीस्थान उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचं आहे. त्यामुळे त्यांना त्यात विचारात घ्यावं लागेल", असं शरद पवारांनी यावेळी स्पष्ट केलं.दरम्यान, एकीकडे शरद पवारांनी स्थानिक स्वराज्य संस्था व विशेषत: मुंबई महानगर पालिका निवडणुका उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेसोबत लढण्याचे संकेत दिलेले असताना दुसरीकडे उद्धव ठाकरे व राज ठाकरे हे दोघे भाऊ एकत्र येण्याच्या जोरदार चर्चा चालू आहेत. त्यासंदर्भात उद्धव ठाकरेंनी गुरुवारी मुंबईत झालेल्या पक्षाच्या मेळाव्यातदेखील भाष्य केलं आहे.गेल्या काही दिवसांपासून बातम्या सुरू आहेत. काय होणार? होणार का?

# इराकमध्ये इराणच्या समर्थनार्थ घोषणाबाजी!

## इराणचा इस्रायलवर बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांचा मारा

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था | महाईन्यूज

**इराणकडून इस्रायलवर शुक्रवारी बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागण्यात आल्याचे इस्रायली सैन्याने स्पष्ट केले आहे. "काही वेळापूर्वी, इराणकडून इस्रायलकडे डागण्यात आलेल्या क्षेपणास्त्रांची ओळख पटल्यानंतर इस्रायलमधील अनेक भागात सायरन वाजले," असे लष्कराने एका निवेदनात म्हटले आहे.**



टाईम्स ऑफ इस्रायलच्या वृत्तानुसार, दक्षिणेकडील बेरशेबा परिसरात व तेल अवीव आणि जेरुसलेममध्ये असंख्य स्फोटांचे मोठे आवाज ऐकू आले. या वृत्तात पुढे म्हटले आहे की, या हल्ल्यामुळे हैफामध्ये दोन जण जखमी झाले आहेत, ज्यात एका किशोरवयीन मुलाचा समावेश आहे.रॉयटर्सच्या वृत्तानुसार, इस्रायल पोलिसांनी काही ठिकाणी हल्ला झाल्याची पुष्टी केली, परंतु त्यांनी याबाबत अधिक माहिती दिली नाही. दरम्यान, गेल्या आठ दिवसांपासून इराण आणि इस्रायल यांच्यात लष्करी संघर्ष सुरू असून, यामध्ये शेकडो नागरिकांचा मृत्यू झाला आहे आणि हजारो लोक जखमी झाले आहेत. इस्रायलच्या लष्कराने शुक्रवारी दिलेल्या माहितीनुसार, त्यांनी तेहरानमधील डझनभर लक्ष्यांवर रात्री हल्ला केला असून, त्यामध्ये इराणच्या अण्वस्त्र प्रकल्पाच्या संशोधन आणि विकास केंद्राचाही समावेश आहे. दरम्यान, इराणच्या लष्कराने दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी रात्री त्यांनी इस्रायलवर १०० हून अधिक लढाऊ आणि आत्मघातकी ड्रोन सोडले आहेत. इराण-इस्रायल यांच्यातील संघर्ष सुरू झाल्यापासून इस्रायलमध्ये किमान २५ लोकांचा मृत्यू झाला असून, २०० हून अधिक जण जखमी झाले आहेत. दुसरीकडे, इस्रायली हल्ल्यात २२४ इराणी लोकांचा मृत्यू झाला आहे. दरम्यान, रविवारपासून इराणने आपल्या नागरिकांच्या मृतांची अधिकृत माहिती जाहीर केलेली नाही.अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे की, ते पुढील दोन आठवड्यांत इराणवरील इस्रायलच्या हल्ल्यात सहभागी व्हायचे की नाही, याचा निर्णय घेतील, कारण हा संघर्ष संपवण्यासाठी वाटाघाटी होण्याची अजूनही शक्यता आहे. शुक्रवारच्या नमाजानंतर हजारो इराकी लोकांनी इराणला पाठिंबा देण्यासाठी बगदादच्या सदर सिटी आणि इतर शहरांमध्ये एकत्र येत अमेरिका आणि इस्रायलविरोधी घोषणा दिल्या. यावेळी निदर्शकांनी या संघर्षात इराण विजयी होईल अशी आशा व्यक्त केली. याचबरोबर त्याने इराक सरकारला इरानला आर्थिक आणि लष्करी मदत देण्याचे आवाहन केले. इराण आणि इस्रायलमध्ये गेल्या आठवड्यापासून लष्करी संघर्ष सुरू आहे. आता हा संघर्ष आणखी तीव्र होत आहे. यामुळे या दोन्ही देशांमध्ये विद्यार्थी, यात्रेकरू, संशोधक आणि कामगारांसह लाखो भारतीय नागरिक अडकले आहेत. तेहरान आणि तेल अवीवमधील भारतीय दूतावास भारतीय नागरिकांना मायदेशी आणण्यासाठी त्यांच्याशी समन्वय साधत आहेत. यातील काही भारतीय नागरिक धार्मिक केंद्रांमध्ये, तर काही भारतीय विद्यार्थी विद्यापीठांमध्ये विखुरलेले आहेत. त्यामुळे त्यांच्याशी संपर्क साधण्यात अडचणी निर्माण होत आहेत. दरम्यान, इस्रायलने इराणवर क्षेपणास्त्रांचा मारा सुरू केल्यापासून उत्तर प्रदेशातील बुलंदशहरच्या सकनी गावातील दहा विद्यार्थ्यांशी संपर्क साधणे कठीण झाले आहे. त्यापैकी २२ वर्षीय सदाफ जेहरा ही तेहरान विद्यापीठात एमबीबीएसच्या तिसऱ्या वर्षाची विद्यार्थिनी आहे. तिचे वडील झिया-उल-हसन म्हणाले, "तिने सांगितले की ती ठीक आहे, नंतर तिचा फोन बंद झाला. दुसऱ्या दिवशी तिने फोन केला आणि सांगितले की विद्यापीठाने त्यांना तीन तासांच्या अंतरावर असलेल्या सुरक्षित ठिकाणी हलवले आहे." याबाबत टाईम्स ऑफ इंडियाने वृत्त दिले आहे.

### एक हजार यात्रेकरू अडकले

याबाबत बोलताना त्याचे काका मुझम्मिल अब्बास म्हणाले की, "आम्ही तीन दिवसांपूर्वी त्याच्याशी व्हिडिओ कॉलवर बोललो होतो. तेव्हापासून त्याच्याशी कोणताही संपर्क झालेला नाही."याचबरोबर उत्तर प्रदेशातील, इतर अनेकांची परिस्थिती अशीच आहे. लखनौ, प्रयागराज, वाराणसी आणि मेरठ येथील अनेक यात्रेकरू इराणमध्ये अडकले आहेत. त्यापैकी लखनौचे २८ यात्रेकरू आहेत, ज्यात ८३ वर्षीय कनीज हैदर यांचा समावेश आहे. त्यांच्यासोबत प्रवास करणारा त्यांच्या मुलगा अब्बास मुझफ्फर यांनी सांगितले की, "आम्ही सध्या सुरक्षित आहोत, पण आम्हाला भारतात परतायचे आहे. हॉटेल्स महाग आहेत.

# अमेरिका-पाकिस्तान यांच्यात काय शिजतंय?

## डोनाल्ड ट्रम्प-असीम मुनीर भेटीत विविध मुद्द्यांवर चर्चा

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था | महाईन्यूज

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि पाकिस्तानचे आर्मी चीफ फील्ड मार्शल असीम मुनीर यांची व्हाईट हाऊस येथे दुपारच्या जेवणाच्या वेळी भेट झाली. यावेळी दोन्ही नेत्यांनी सध्या सुरू असलेल्या इराण-इस्रायल संघर्षाच्या मुद्दयावर सविस्तर चर्चा केली. गुरूवारी पाकिस्तानी लष्कराने एक निवेदन जारी करत याबद्दल माहिती दिली आहे.**





"इराण आणि इस्रायल यांच्यातील सध्याच्या तणावाच्या परिस्थितीवर देखील सविस्तर विचारांची देवाणघेवाण झाली, यावेळी दोन्ही नेत्यांनी हा संघर्ष थांबवण्याच्या महत्त्वावर भर दिला.मुनीर यांच्याबरोबर इराणबाबत चर्चा करण्यात आली का? याबद्दल विचारले असता ट्रम्प म्हणाले की, "खरंतर ते इराणला बहुतेकांपेक्षा अधिक चांगल्या प्रकारे ओळखतात आणि ते या कोणत्याही गोष्टीबद्दल खूष नाहीत." डोनाल्ड ट्रम्प पुढे बोलताना म्हणाले की, "असे नाही की त्यांचे इस्त्रायलबरोबर वाईट संबंध आहेत. ते दोघांना चांगले ओळखतात, पण कदाचित ते इराणला जरा अधिक चांगलं ओळखतात, पण त्यांना काय सुरू आहे याची कल्पना आहे, आणि ते (असीम मुनीर) माझ्याशी सहमत आहेत."या भेटीनंतर पाकिस्तानी लष्कराने इस्लामाबाद येथे सांगितले की, अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी दीर्घकालीन धोरणात्मक हितसंबंधांच्या आधारे दोन्ही देशांना फायदेशीर ठरतील असे व्यापारी संबंध पाकिस्तानबरोबर विकसीत करण्यात रस दाखवला. दिल्लीच्या आकलनानुसार, अमेरिका रावळपिंडीचा पाठिंबा मिळवत आहे याचे कारण हे आगामी काळात इराणवर कोणत्याही प्रकारचा लष्करी हल्ला करण्यासाठी त्यांना पाकिस्तानचे हवाई क्षेत्र, हवाई तळ आणि इतर पायाभूत सुविधा यांचा वापर करायचा आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ट्रम्प यांनी मुनीर यांच्याबरोबर दुपारचे जेवण घेण्यामागे हाच मुख्य हेतू होता.

### भेट घेण्याचे कारण काय?

द इंडियन एक्सप्रेसने यासंबंधीचे वृत्त दिले आहेभारत आणि पाकिस्तान यांच्यातील अणुयुद्ध रोखल्याबद्दल अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे नाव नोबेल शांतता पुरस्कारासाठी सुचविल्यानंतर ट्रम्प हे मुनीर यांचे आतिथ्य करत होते.पण सुत्रांनी सांगितले की, ही बैठक नियमित राजनैतिक मार्गांनी आयोजित करण्यात आलेली नव्हती, आणि यासाठी सल्लागार, उद्योजक आणि इतर प्रभावशाली व्यक्तींकडून नेहमीपेक्षा वेगळ्या प्रकारचे प्रयत्न करण्यात आले. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अधिक मजबूत दहशतवाद-विरोधी सहकार्य, क्रिप्टो-लिंक्ड इन्फ्लुअन्स नेटवर्क्सशी संबंध, आणि वॉशिंग्टन येथील रिपब्लिकन-संलग्न फर्मींच्या मदतीने करण्यात आलेले टार्गेटेड लॉबिंग यांद्वारे पाकिस्तानला ट्रम्प यांच्याबरोबरची ही बैठक करणे शक्य झाले.

# आर. माधवनने अपार्टमेंट दिले भाड्याने

प्रसिद्ध बॉलीवूड अभिनेता आर. माधवन आणि त्याच्या पत्नीने मुंबईतील त्यांचे एक अपार्टमेंट भाड्याने दिले आहे, ज्याचे मासिक भाडे ६.५० लाख रुपये असल्याचे सांगितले जाते. रिअल इस्टेट प्लॅटफॉर्म स्क्वेअर याईसने दिलेल्या वृत्तानुसार, मालमत्ता नोंदणी कागदपत्रांनुसार, अभिनेता आर. माधवन आणि त्याची पत्नी सरिता यांनी मुंबईतील वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्समधील त्यांचे निवासी अपार्टमेंट भाड्याने दिले आहे. जून २०२५ मध्ये भाडेपट्टा आणि परवाना करार अधिकृतपणे नोंदणीकृत झाला. वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स (बीकेसी) हा मुंबईतील एक अतिशय पॉश परिसर आणि व्यावसायिक केंद्र आहे. या ठिकाणी अनेक मोठ्या वित्तीय कंपन्या आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांचे कार्यालय





आणि व्यावसायिक दूतावास आहे, त्यामुळे वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्समध्ये मालमत्तेच्या किमती आणि भाडे दोन्ही खूप जास्त आहेत. आर. माधवन आणि त्याच्या पत्नीने जुलै २०२४ मध्ये १७.५० कोटी रुपयांना हे ३८८.५५ चौरस मीटर (४,१८२ चौरस फूट) अपार्टमेंट खरेदी केले होते.स्क्वेअर याईसना मिळालेल्या मालमत्ता नोंदणी कागदपत्रांनुसार, आर. माधवन आणि त्यांची पत्नी सरिताने वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्समधील 'सिग्निया पर्ल' येथे एक अपार्टमेंट भाड्याने दिले आहे. भाडे करारात ३९ लाख रुपयांची सुरक्षा ठेव समाविष्ट आहे आणि त्याची नोंदणी ४७,००० रुपये स्टॅम्प ड्युटी आणि १,००० रुपये नोंदणी शुल्कासह करण्यात आली आहे. स्क्वेअर याईसच्या मते, या मालमत्ता कराराचा भाडेपट्टा कालावधी २४ महिने (२ वर्षे) आहे, जो जून २०२५ च्या पहिल्या आठवड्यापासून सुरू झाला आहे आणि १६ महिन्यांचा लॉक-इन कालावधी असेल. मासिक भाडे पहिल्या वर्षी ६.५० लाख रुपयांपासून सुरू होते आणि दुसऱ्या वर्षी ५% वाढून सुमारे ६.८३ लाख रुपये होईल. अशा प्रकारे या संपूर्ण कालावधीत मिळालेले एकूण भाडे सुमारे १.६० कोटी रुपये असण्याचा अंदाज आहे.आर. माधवनने त्याच्या कारकिर्दीत हिंदी, तमिळ, तेलुगू आणि मल्याळम भाषांमधील अनेक उत्तम चित्रपट केले आहेत.

# प्रार्थना बेहेरेच्या पायाला गंभीर दुखापत



अभिनेत्री प्रार्थना बेहेरेने नुकतीच सोशल मीडियावर एक पोस्ट केली आहे, यामधून अभिनेत्रीच्या पायाला गंभीर दुखापत झाल्याचं दिसत आहे. तिने शेअर केलेल्या पोस्टमधून याबाबतची माहिती दिली आहे. प्रार्थनाने पोस्ट केलेल्या फोटोंमध्ये तिच्या डाव्या पायाला दुखापत झाल्याचं दिसत आहे. तिच्या पायाची शस्त्रक्रिया झाल्याचंही तिने यामधून सांगितलं आहे. अभिनेत्रीने पोस्ट केलेल्या फोटोंखाली कॅप्शनमधून तिच्या डाव्या पायाच्या गुडघ्याची शस्त्रक्रिया झाल्याचं सांगितलं आहे. या फोटोंमधून ती तिच्या घरी बसलेली असून सध्या शस्त्रक्रियेनंतर आराम करत असल्याचं दिसत आहे. प्रार्थना नेहमीच सोशल मीडियावर सक्रिय असते. तिच्या दैनंदिन जीवनातील घडामोडी ती तिच्या चाहत्यांसह शेअर करत असते.

# 'लक्ष्मीच्या पाऊलांनी' फेम अक्षर अडकला विवाहबंधनात

२०२५ या वर्षात मराठी इंडस्ट्रीतील अनेक कलाकारांनी आपल्या लग्नगाठ बांधली. २०२५ या नवीन वर्षात दिव्या पुगांवकर, अभिषेक रहाळकर, निरंजन कुलकर्णी, अक्षय केळकरसह अनेक कलाकार विवाहबंधनात अडकले. अशातच आता यात आणखी एका मराठी अभिनेत्याचं नाव सामील झालं आहे. हा अभिनेता म्हणजे अक्षर कोठारी. अक्षरने नुकतीच विवाहगाठ बांधली आहे आणि याचे खास क्षण शेअर केले आहेत.अक्षरने इन्स्टाग्रामवर पत्नी सारिका खसणीसबरोबरचे लग्नाचे फोटो शेअर करत चाहत्यांना सुखद धक्का दिला आहे. अक्षरने लग्नाचे फोटो शेअर करत "THEN, NOW AND ALWAYS" असं कॅप्शन दिलं आहे. या कॅप्शनसह त्याने 'बचपन का प्यार' हा हटके हॅशटॅगही दिला आहे. त्याचबरोबर दोघांनी त्यांच्या नावानुसार 'SAAKSHAR' हाही युनिक हॅशटॅग लिहिला आहे.अक्षरने शेअर केलेल्या या फोटोमध्ये त्याने ऑफ व्हाईट



रंगाचा सूट आणि तयाची पत्नी सारिकाने अबोली रंगाची साडी परिधान केली आहे. या फोटोंमध्ये अक्षर आणि सारिका दोघेही आनंदी असल्याचं पाहायला मिळत आहे. दरम्यान, अक्षरने शेअर केलेल्या फोटोखाली मालिकेतील सहकलाकार तसंच इंडस्ट्रीतील इतर अनेक कलाकारांनीही शुभेच्छांचा वर्षाव केला आहे.आकाश नलावडे, ईशा केसकर, अपूर्वा नेमळेकर, दीपाली पानसरे, दिव्या पुगांवकर, समृद्धी केळकर, अभिजीत खांडकेकर, ऋतुजा बागवे, गिरिजा प्रभू, रेश्मा शिंदे यांसह अनेक कलाकार मंडळींनी कमेंट्समध्ये त्याला शुभेच्छा दिल्या आहेत. त्याचबरोबर अक्षरच्या अनेक चाहत्यांनीही त्याला अभिनंदन म्हटलं आहे.अक्षरची पत्नी सारिकाबद्दल सांगायचं झालं तर, ती SCIENTIST असल्याची माहिती आहे. सारिकाने तिच्या इन्स्टाग्रामच्या बायोमध्ये SCIENTIST असल्याचं म्हटलं आहे. तर अक्षर कोठारी सध्या स्टार प्रवाहवरील 'लक्ष्मीच्या पाऊलांनी' या मालिकेतून प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे. या मालिकेतील त्याची अद्वैत ही भूमिका प्रेक्षकांच्या चांगलीच पसंतीस पडत आहे.

# दीपिकाच्या काम करण्याच्या मागणीबद्दल रेणुकानी व्यक्त केलं मत

बॉलीवूड अभिनेत्री दीपिका पादुकोणने काही दिवसांपूर्वी 'स्पिरीट' चित्रपटातून एक्झिट घेतल्याची घोषणा केली. दीपिकाने दिग्दर्शक संदीप रेड्डी वांगा यांच्याबरोबर आठ तासांच्या शिफ्टमध्ये काम करण्याची अट घातली होती. ज्यावर एकमत न झाल्याने अभिनेत्रीने हा चित्रपट सोडला. दीपिकाच्या 'स्पिरीट'मधील एक्झिटनंतर कामाचे तास आणि काम करण्याच्या पद्धतीबद्दलच्या अनेक चर्चा होताना दिसत आहेत. यावर अनेक कलाकार मंडळी त्यांची मतं व्यक्त करत आहेत. अशातच आता अभिनेत्री रेणुका शहाणे यांनी कलाकारांच्या आठ तासांच्या कामाच्या शिफ्टबद्दल प्रतिक्रिया व्यक्त केली. 'आठ तासांच्या कामाची शिफ्ट असणे हा पूर्णपणे वैयक्तिक निर्णय असावा. त्यासाठी कोणताही नियम बनवू नये' असे रेणुका शहाणे यांचे मत आहे. तसंच त्यांनी सांगितले की, कामाचे तास हे एखाद्याच्या गरजेवर आणि निवडीवर अवलंबून असतात.





कोणत्याही सामाजिक दबावावर नाही.न्यूज 18 नुसार, हिंदुस्तान टाईम्सला रेणुका शहाणेंनी सांगितलं, "या विषयावर मी कोणतेही एकतर्फी विधान करू इच्छित नाही; कारण अनेक पुरुष कलाकारदेखील आहेत; जे महिला कलाकारांबरोबरच कामाचे तास कमी करू इच्छितात. केवळ महिला कलाकारच नाही तर अनेक कलाकारांना त्यांच्या कुटुंबियांबरोबर वेळ घालवायचा असतो. त्यामुळे ही फक्त महिलांची मागणी आहे, असे म्हणणे चुकीचे ठरेल. हा वैयक्तिक निर्णय आहे."यापुढे रेणुका शहाणे म्हणाल्या, "अशा अनेक महिला माहित आहेत; ज्या १८ तासांच्या शिफ्टमध्ये आपल्या मुलांना सेटवर घेऊन येतात आणि तिथे त्यांची काळजी घेतात. त्यामुळे ही वैयक्तिक निवड आहे. यासाठी कोणतीही सक्ती नसावी. कलाकार आणि निर्मात्यामध्ये आदराची भावना असली पाहिजे. कारण, जर एकमेकांविषयी आदर नसेल, तर तुम्ही काम करू शकणार नाही."दरम्यान, दीपिकाने दिवसाला फक्त आठ तास काम करण्यासह काही अटी ठेवल्या होत्या, ज्या दिग्दर्शक संदीप रेड्डी वांगाने मान्य करण्यास नकार दिला. त्यानंतर दीपिकाने 'स्पिरीट' चित्रपट सोडला. या निर्णयानंतर सोशल मीडियावर वाद सुरू झाला आहे.

# भारताच्या नव्या पर्वाला 'शुभ' सुरुवात!

## भारताने पहिल्याच दिवशी बॅझबॉलला दाखवला इंगा

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारतीय संघाने इंग्लंड दौऱ्याला शानदार सुरूवात करत पहिल्याच दिवशी चांगली धावसंख्या उभारत सामन्यात आपला दबदबा काय ठेवला. इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्सने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. यासह भारताला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं. भारतीय संघाने चांगली सुरूवात करत मोठ्या धावसंख्येचा पाया रचला..**




विराट कोहली, रोहित शर्मा, चेतेश्वर पुजारा, अजिंक्य रहाणे या दिग्गजांच्या अनुपस्थितीत नवख्या भारतीय संघाचा इंग्लंडसमोर कसा निभाव लागणार असा सर्वांनाच प्रश्न होता. पण या नवख्या टीम इंडियाने लीड्स कसोटीच्या पहिल्याच दिवशी चांगली कामगिरी करत मोठी धावसंख्या उभारली. भारताने पहिल्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत ८५ षटकांत ३ बाद ३५९ धावा केल्या आहेत.भारताकडून यशस्वी जैस्वाल आणि केएल राहुलची जोडी सलामीला उतरली. या दोघांनी संघाला चांगली सुरूवात करून देत ९१ धावांची भागीदारी केली. पहिले सत्र संपायच्या काही मिनिट आधी केएल राहुल झेलबाद झाला आणि इंग्लंडला पहिली विकेट मिळाली. यानंतर भारताचा पदार्पणवीर साई सुदर्शन खातंही न उघडता झेलबाद झाला.

पहिल्याच कसोटी त्याला भोपळाही फोडता नाही आला आणि लंचपर्यंत भारताने चांगल्या सुरूवातीनंतर ९२ धावांवर दोन विकेट्स गमावले.केएल राहुल ७८ चेंडूत ८ चौकारांसह ४२ धावा करत बाद झाला. ब्रायडन कार्सच्या गोलंदाजीवर राहुल स्लिपमध्ये जो रूटकरवी झेलबाद झाला. यानंतर साई सुदर्शन भोपळा न फोडताच माघारी परतला. बेन स्टोक्सने सापळा रचत सुदर्शनला विकेटकिपर करवी बाद केलं.

यानंतर आलेल्या शुबमन गिलने जैस्वालच्या साथीने डाव सांभाळला. दुसऱ्या सत्रात यशस्वी जैस्वालने विक्रमी शतक केलं. जैस्वाल १९ चेंडूत १६ चौकार आणि एका षटकारासह १०१ धावा करत बाद झाला. जैस्वालला बेन स्टोक्सने क्लीन बोल्ड करत बाद केलं.जैस्वाल बाद झाल्यानंतर कर्णधार-उपकर्णधाराची जोडी मैदानात खेळत होती. गिलने चौकार लगावत कर्णधार म्हणून पहिलं कसोटी शतक झळकावलं. यानंतर उपकर्णधार ऋषभ पंतने चौकार-षटकारांच्या फटकेबाजीसह वादळी अर्धशतक पूर्ण केलं. सध्या १९८ चेंडूत १३८ धावांची भक्कम भागीदारी करत दोन्ही फलंदाज मैदानावर नाबाद आहेत. गिल १२७ धावा तर ऋषभ पंत ६५ धावा करत नाबाद परतले आहेत. कर्णधार-उपकर्णधाराची जोडी दुसऱ्या दिवशी भारताचा डाव पुढे नेईल.इंग्लंड दौऱ्यासह भारतीय क्रिकेटच्या नव्या पर्वाला सुरूवात झाली आहे. भारताचा नवा कर्णधार शुबमन गिलच्या खांद्यावर टीम इंडियाच्या नेतृत्त्वाची जबाबदारी देण्यात आली आहे. पहिल्याच सामन्यात नवा कर्णधार शुबमन गिलने शतक झळकावलं आहे. यशस्वी जैस्वालचं शतक, त्यानंतर शुबमन गिलची शतकी खेळी आणि ऋषभ पंतच्या साथीने भारताने ३०० धावांचा पल्ला गाठला. भारतीय संघाने पहिल्याच दिवशी मोठी धावसंख्या उभारली आहे.

शुबमन गिलने पहिल्या कसोटी सामन्याची नाणेफेक गमावली आणि संघ प्रथम फलंदाजीसाठी उतरला. पण भारताच्या फलंदाजांनी लीड्सच्या खडतर खेळपट्टीवर चांगली फलंदाजी केली. राहुल-यशस्वीने ९१ धावांची भागीदारी रचत संघाला चांगली सुरूवात करून दिली. यानंतर दुसऱ्या सत्रात यशस्वी जैस्वालने शानदार शतक झळकावत टीम इंडियाला सामन्यात पुढे ठेवलं. जैस्वाल बाद झाल्यानंतर गिलने ऋषभ पंतच्या साथीने संघाचा डाव सावरला.

### ऋषभ पंतचं अर्धशतक

गिलने शानदार सुरूवात करत झटपट आपले अर्धशतक झळकावले.शुबमन गिलने १३९ चेंडूत १४ चौकारांसह १०३ धावा करत आपलं शतक पूर्ण केलं. यासह तो पदार्पणात शतक झळकावणाऱ्या भारतीय कर्णधारांच्या खास यादीत आपलं नाव नोंदवण्यात यशस्वी ठरला. शुबमन गिलच्या शतकानंतर ऋषभ पंतनेही त्याचं अर्धशतक पूर्ण केलं. पंतने ९२ चेंडूत ५ चौकार आणि एका षटकारासह ५२ धावा करत अर्धशतक पूर्ण केले.पहिल्याच कसोटी त्याला भोपळाही फोडता नाही आला आणि लंचपर्यंत भारताने चांगल्या सुरूवातीनंतर ९२ धावांवर दोन विकेट्स गमावले.केएल राहुल ७८ चेंडूत ८ चौकारांसह ४२ धावा करत बाद झाला. ब्रायडन कार्सच्या गोलंदाजीवर राहुल स्लिपमध्ये जो रूटकरवी झेलबाद झाला. यानंतर साई सुदर्शन भोपळा न फोडताच माघारी परतला.

---

## भारताला ५ पेनल्टी धावा का देण्यात आल्या?

## जो रुटने डोक्याला लावला हात; काय आहे नियम?

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारत पहिल्या कसोटी सामन्यात नाणेफेक गमावल्यानंतरही चांगल्या स्थितीतही आहे. भारताचा पहिला कसोटी सामना लीड्सच्या मैदानावर खेळवला जात आहे. या सामन्यात केएल राहुल आणि यशस्वी जैस्वाल यांनी ९१ धावांची भागीदारी रचत संघाला चांगली सुरूवात करून दिली. भारताने तिसऱ्या सेशनमध्ये २५० धावांचा टप्पा गाठला असून फक्त ३ विकेट गमावले आहेत.**

लीड्सच्या मैदानावरील पहिल्या कसोटीच्या दुसऱ्या सत्रात टीम इंडियाला अतिरिक्त ५ धावा देण्यात आल्या. जो रूटला तर विश्वासच बसत नव्हता की नेमकं काय झालं, तर बेन स्टोक्सही वैतागला होता. पण कोणत्या कारणामुळे भारताला अतिरिक्त ५ धावा मिळाल्या, जाणून घेऊया.५१व्या षटकात ही घटना घडली. स्टोक्सने या षटकातील पाचवा चेंडू टाकला. जैस्वालने चेंडू खेळला आणि तो दुसऱ्या स्लिपमध्ये उभ्या असलेल्या हॅरी ब्रुकजवळ गेला. हॅरीने चेंडू लगेच यष्टीरक्षकाच्या दिशेने फेकला. चेंडू विकेटकिपरच्या डाव्या दिशेने थ्रो केला आणि तो चेंडू पकडू न शकल्याने मैदानावर ठेवलेल्या हेल्मेटवर जाऊन हा चेंडू आदळला आणि त्यामुळे इंग्लंडला




५ धावांचा दंड ठोठावला गेला. चेंडू हेल्मेटला लागताच, ब्रूकच्या चुकीमुळे भारताला पाच पेनल्टी धावा मिळाल्यावर रूट डोक्यावर हात ठेवून मैदानात बसला होता. जेव्हा क्षेत्ररक्षक त्यांचं हेल्मेट घालत नाहीत, तेव्हा ते त्यांना फक्त विकेटकीपरच्या मागे आणि अगदी स्टंपच्या बरोबरीने जमिनीवर ठेवू शकतात. ते मैदानावर इतरत्र कुठेही ठेवू शकत नाहीत. नियमानुसार जर एखादा लीगल चेंडू कायदेशीररित्या ठेवलेल्या हेल्मेटला लागला तर तो डेड बॉल होतो. तर फलंदाजी करणाऱ्या संघाला ५ पेनल्टी धावा देखील दिल्या जातील. जर तो नो बॉल किंवा वाईड असेल तर पंच नेहमीप्रमाणे सिग्नल देतील.जैस्वालने शानदार शतक झळकावले आणि गिलने अर्धशतकी खेळी करत जैस्वालला साथ दिली. यासह भारताने टीब्रेकपर्यं २ बाद २१५ धावांपर्यंत मजल मारली होती. जैस्वाल १०१ धावा करत बाद झाला. तर त्यापूर्वी राहुल ४२ धावा करत बाद झाला. तर पदार्पणवीर साई सुदर्शन खातंही उघडू शकला नाही.लीड्सच्या मैदानावरील पहिल्या कसोटीच्या दुसऱ्या सत्रात टीम इंडियाला अतिरिक्त ५ धावा देण्यात आल्या. जो रूटला तर विश्वासच बसत नव्हता की नेमकं काय झालं, तर बेन स्टोक्सही वैतागला होता. पण कोणत्या कारणामुळे भारताला अतिरिक्त ५ धावा मिळाल्या, जाणून घेऊया.५१व्या षटकात ही घटना घडली.

### इंग्लंडला 5 धावांचा दंड ठोठावला गेला

जैस्वालने चेंडू खेळला आणि तो दुसऱ्या स्लिपमध्ये उभ्या असलेल्या हॅरी ब्रुकजवळ गेला. हॅरीने चेंडू लगेच यष्टीरक्षकाच्या दिशेने फेकला. चेंडू विकेटकिपरच्या डाव्या दिशेने थ्रो केला आणि तो चेंडू पकडू न शकल्याने मैदानावर ठेवलेल्या हेल्मेटवर जाऊन हा चेंडू आदळला आणि त्यामुळे इंग्लंडला ५ धावांचा दंड ठोठावला गेला.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। शनिवार।
। दि. 21 जून 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## टाळ-मृदंग अन् हरीनामाचा गजर

# संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे भक्तीभावात स्वागत!

## आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने सेवा उपक्रम

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**श्रीक्षेत्र देवाची आळंदी येथून प्रस्थान केलेल्या संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या आषाढी वारी पायी पालखी सोहळ्याचे मॅगझिन चौक, भोसरी येथे उत्साहात स्वागत करण्यात आले. भारतीय जनता पक्षाच्या वतीने आयोजित केलेल्या या स्वागत सोहळ्यासाठी आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला.**



टाळ-मृदंगाचा गजर आणि हरीनामाचा जयघोष करीत पालखी सोहळा उद्योगनगरीमध्ये दाखल झाला. वारकऱ्यांना पावसापासून संरक्षण मिळावे म्हणून छत्र्या, रेनकोटचे वाटप, तसेच पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या, केळी, फराळ व लाडूंचे वितरण करण्यात आले. याशिवाय हेल्थ चेकअप कॅम्प व वैद्यकीय सेवा सुद्धा उपलब्ध करून देण्यात आल्या. दरम्यान, पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासन, पोलीस विभाग, स्वयंसेवी संस्था व सामाजिक कार्यकर्ते यांचे सुद्धा नियोजन चोख होते. स्थानिक आमदार म्हणून महेश लांडगे यांनी प्रतिवर्षीप्रमाणे सेवा देण्याची भूमिका घेतल्याने उपस्थित भाविकांमध्ये समाधान आणि आनंदाची भावना दिसून आली. सदर स्वागत सोहळ्यास विधान परिषदेच्या आमदार चित्रा वाघ सुद्धा उपस्थित होत्या. त्यांनीही वारकरी भगिनींसोबत फुगडीचा फेर धरला. वारीच्या निमित्ताने पिंपरी-चिंचवड शहरात भक्तीभाव, सेवाभाव आणि सामाजिक सलोखा यांचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला.

“वारी ही केवळ परंपरा नाही, ती आपल्या श्रद्धेचा आणि संस्कृतीचा आत्मा आहे. संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी सोहळ्याच्या निमित्ताने लाखो वारकरी आपल्या पवित्र भावनेनिशी निघालेले असतात. अशा वारकरी भक्तांची सेवा करता आली, तर तो माझ्यासाठी सन्मानच आहे. वारकरी हेच खरे विठ्ठल, त्यांची सेवा म्हणजेच खरी वारी अशी आमची भावना आहे. पिंपरी-चिंचवड शहरातून संत तुकोबा आणि संत ज्ञानोबा यांची पालखी मार्गस्थ होत असताना त्यांना कोणतीही अडचण होऊ नये, म्हणून आम्ही नियोजनपूर्वक सेवा उपक्रम राबवले. ही आपली जबाबदारीच आहे. संत परंपरेचा आणि वारकऱ्यांच्या भक्तीचा हा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे, हे आपले सामूहिक कर्तव्य आहे.”
**-महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

### समरसतेचे प्रतीक वारी...

संत ज्ञानेश्वर माऊली आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालख्या आणि पंढरीची वारी म्हणजे महाराष्ट्राचं सांस्कृतिक वैभव आहे. नव्हे ती महाराष्ट्राची ओळख आहे. सामाजिक एकोपा, बंधुभाव शिकविणाऱ्या या पालखी सोहळ्याला शेकडो वर्षांचा इतिहास आहे. हा इतिहास संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक श्रीधरबुवा देहूकर आणि त्यांचे चिरंजीव डॉ. सदानंद मोरे यांनी लिहून ठेवला आहे. या संतविचारांनी प्रेरीत होवून आम्ही टाळगाव चिखली येथे भारतातील पाहिले जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतीपीठ उभारण्याचा संकल्प केला. संतकृपेने हे ज्ञानमंदिर उभा राहिले आज या ठिकाणी 1600 हून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. वारीत सहभागी झाल्यानंतर अध्यात्म आणि आधुनिक शिक्षणासाठी केलेल्या कार्याचे मनोमन समाधन वाटले, अशा भावना आमदार लांडगे यांनी व्यक्त केल्या आहेत.




Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
Powered by
JAI HIND EDUTECH
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
ADMISSION
OPEN
2025-2026
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
• Computer Science
• Crop Science
• Electronics
• Mechanical / Technical Automobile
• Information Technology (IT)
For Commerce Stream
• Banking
• Marketing & Sales
• Office Management
• Small Industries & Self employment
• Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241


Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42
Years of Excellence in Education
EDUCATING MIND & HEART
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic
Empowering
Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
Not just education, but
Personality transformation.
ADMISSIONS OPEN for 2025-26
• CBSE curriculum
• Initiatives like 'Read-to-Lead'
• Tradition of 100% result
Gayatri English Medium School & Junior College, Charholi
95277 64646 / 77967 67292